मंगळवार, दि. १० फेब्रुवारी २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक १६२ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४    8390098886    yuva.aadarsh@gmail.com    8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/    https://youtube.com/@Yuva_Aadarsh/    https://twitter.com/Yuva_aadarshjln/    RNI: MAHMAR/2019/78282

## राज्यात ७० हजार पदांची मोठी नोकरभरती

**मुंबई** - राज्यात लवकरच सुमारे ७० हजार पदांची मोठी नोकरभरती प्रक्रिया राबवण्यात येणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. ही भरती नव्या, पारदर्शक आणि डिजिटल पद्धतीने करण्यात येणार असून तरुणांसाठी ही मोठी संधी मानली जात आहे. या भरतीमध्ये महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत (चझडउ) घेण्यात येणाऱ्या सुमारे २० हजार पदांचा समावेश असेल, तर उर्वरित पदे आयोगाबाहेरील विविध विभागांमध्ये भरली जाणार आहेत. सह्याद्री अतिथीगृह येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली सेवा प्रवेश नियमावली सुधारणा संदर्भात उच्चस्तरीय बैठक पार पडली. बैठकीस मुख्य सचिव राजेश अग्रवाल तसेच सर्व अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव आणि संबंधित विभागांचे सचिव उपस्थित होते. भरती प्रक्रियेत आवश्यक कौशल्ये (Skills Based Recruitment), पात्रता निकष आणि कामाच्या स्वरूपानुसार निर्णय घेतले जातील, असे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले. सेवा प्रवेश नियमावलीतील बदलांचा प्रस्ताव लवकरच मंत्रिमंडळ बैठकीत मांडला जाणार आहे. भरती प्रक्रियेत अनावश्यक कागदपत्रे, लांब रांगा आणि विलंब टाळण्यासाठी ऑनलाइन व डिजिटल व्हेरिफिकेशन मॉडेल विकसित करण्यावर भर देण्यात येणार आहे. ब्लॉकचेन तंत्रज्ञान (Blockchain Verification) आणि डिजिलॉकर प्रणालीचा (DigiLocker System) वापर करून प्रमाणपत्र पडताळणी सुलभ करण्यात येईल. पासपोर्टसारख्या संवेदनशील दस्तऐवजांची ऑनलाइन पडताळणी शक्य असल्यास, इतर प्रक्रियांमध्येही हे मॉडेल वापरण्याच्या सूचना देण्यात आल्या. राज्य प्रशासनात कार्यक्षमतेला गती (-dministrative Efficiency Boost) राज्य शासनाच्या विविध विभागांमध्ये ७० हजार पदे भरल्यानंतर प्रशासनाच्या कार्यक्षमतेत मोठी वाढ होईल. भरती प्रक्रियेत कोणताही पक्षपात किंवा अन्याय होऊ नये, यासाठी संपूर्ण प्रणाली पारदर्शक आणि विश्वासार्ह असावी, असेही मुख्यमंत्री म्हणाले.

युवा आदर्श

### हिट रन ...

हिट आणि रनचे
वाढतेयं प्रकरण
अपघातीआलेख
बदले समीकरण
शिक्षाहवी जबरी
कडक हवे धोरण
पायबंद घालायले
कायदा हो स्मरण
अंधधुंद डायव्हिंग
स्वस्त झाले मरण
चूक भुल कुणाची
जीवगेले अकारण
झकास रस्ते बघून
वेगाला येई स्फुरण
कायद्या नियमांचे
फुटूनि वाहते धरण
अपघात पहायला
धावतात सर्व जण
मदतीलाकसेकधी
नसतात कधी पण
भिंती वाटे चालका
बदडतीलं दणादण
पलायन ना ईलाजे
गायब होती रक्षण
चूकातशा सर्वांच्या
बळी ते निष्कारण
आवश्यक प्रबोधन
खोलावे अंत:करण

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

# वंदना मगरे जालना मनपाच्या पहिल्या महापौर; राजेश राऊत उपमहापौर












**जालना । प्रतिनिधी -** जालना नगरपालिकेचे महानगरपालिकेत रूपांतर झाल्यानंतर झालेल्या पहिल्याच निवडणुकीत भाजपने एकहाती सत्ता मिळवत इतिहास रचला आहे. जालना महानगरपालिकेच्या पहिल्या महापौरपदी भाजपच्या वंदना मगरे तर उपमहापौरपदी राजेश राऊत यांची बिनविरोध निवड झाली आहे.

महानगरपालिकेच्या ६५ जागांपैकी ४१ जागांवर विजय मिळवत भाजपने स्पष्ट बहुमत प्राप्त केले. या पार्श्वभूमीवर महापौर व उपमहापौर पदांवर भाजपचेच उमेदवार निश्चित झाले होते. माजी आमदार कैलास गोरंटयाल यांच्या कट्टर समर्थक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या वंदना मगरे यांच्यावर पक्षाने विश्वास टाकत महापौरपदाची जबाबदारी सोपवली आहे.

आज महानगरपालिका सभागृहात झालेल्या निवडणुक कार्यक्रमात वंदना मगरे तर उपमहापौरपदी राजेश राऊत यांची बिनविरोध निवड झाली. पीठासीन अधिकारी म्हणून श्री मिसाळ यांनी काम पाहिले. प्रसंगी नगरसेवकांची उपस्थिती होती. निवडीनंतर तातडीने महापौरपदाचा पदभार वंदनाताई मगरे यांनी स्विकारला.

महापौर आणि उपमहापौर या दोन्ही पदांचा कार्यकाळ १५ महिन्यांचा असणार आहे. वंदना मगरे आणि राजेश राऊत यांच्या नावांची शिफारस माजी आमदार कैलास गोरंटयाल तसेच भाजप महानगराध्यक्ष भास्कर दानवे यांनी प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे केली होती. त्या शिफारशीनुसार दोन्ही पदांसाठी उमेदवारी निश्चित करण्यात आली. महापौर पदासाठी वंदना मगरे व उपमहापौर पदासाठी राजेश राऊत यांनी अर्ज दाखल केले. त्यांच्या विरोधात कोणताही अर्ज दाखल न झाल्याने दोघांचीही निवड बिनविरोध झाल्याचे स्पष्ट झाले होते. जालना महानगरपालिकेच्या महापौर व उपमहापौर पदासाठीची अधिकृत निवडणूक प्रक्रिया ९ फेब्रुवारी रोजी मनपा सभागृहात पार पडली आहे.

दरम्यान, या ऐतिहासिक बिनविरोध निवडीनंतर माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवे, आमदार बबनराव लोणीकर, आमदार नारायण कुचे, माजी आमदार कैलास गोरंटयाल तसेच भाजप महानगराध्यक्ष भास्कर दानवे यांनी महापौर व उपमहापौर यांचे अभिनंदन करत जालनेकरांनी दिलेल्या ऐतिहासिक कौल बद्दल जालनेकरांचेही आभार व्यक्त केले तसेच येत्या काळात जालना शहराच्या विकासासाठी महापालिकेतून प्रभावी कामकाज होईल, असा विश्वास व्यक्त केला आहे.

जालन्याच्या महापौरपदी निवड झाल्यानंतर जालना महानगरपालिकेच्या पहिल्या महापौर वंदना मगरे यांनी भाजप नेत्यांचे आभार मानले आहेत. जालना महानगरपालिकेच्या पहिल्या महापौरपदी भाजपच्या नगरसेविका वंदना मगरे यांची बिनविरोध निवड झाल्यानंतर त्यांनी जालना शहरातील समस्या सोडविण्यासाठी सर्वोतोपरी प्रयत्न करणार असल्याचे सांगितले. शहरातील पाणी पुरवठा समस्या, दिवाबत्ती यासह विविध समस्यां सोडविण्यसाठी सर्वपक्षीय मदत घेण्यासह जालना शहरातील नागरिकांना विचारात घेऊन कार्य करणार असल्याचे त्यांनी सांगितले. त्याच बरोबर दिवंगत अरुण मगरे यांनी शहरासाठी तसेच पक्षासाठी निष्ठेने काम केले. माजी आमदार कैलास गोरंट्याल यांनी दर्शविलेला विश्वास सार्थ करुन दाखवून जालना शहरातील समस्या सोडविण्यासाठी उपस्थित सर्व नेत्यांच्या आदेश आणि मार्गदर्शनाखाली काम करणार असल्याचे श्रीमती वंदना मगरे यांनी सांगितले. महिला सुरक्षेसाठी आणि जालना शहराच्या विकासासाठी काम करेन, अशी प्रतिक्रिया वंदना मगरे यांनी दिली आहे. मला निष्ठेचे फळ मिळाले, असं म्हणत जनतेने मला भरभरून प्रेम दिलं, त्याबद्दल मी जनतेची आभारी आहे, अशी भावना मगरे यांनी व्यक्त केली आहे.

प्रसंगी माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांनी महापौर व उपमहापौर यांनी बिनविरोध निवड झाल्याबद्दल विरोधी पक्षासह सर्वांचे आभार व्यक्त केले. त्याचबरोबर जालना शहरातील जनतेने जो विश्वास भारतीय जनता पक्षावर दाखविला आहे. त्या विश्वासाला तडा जाऊ देणार नाही. जालन्यातील समस्यांची निराकारण करण्यासाठी निवडून आलेल्या सर्व नगरसेवकांनी आपआपल्या प्रभागात फेरफटका मारून समस्या जाणून घेऊन त्या सोडविण्यासाठी प्रयत्न करावेत. राज्य व देश पातळीवरून जर मदतीची गरज असेल तर सर्वो तोपरी मदत करण्याची आश्वासन श्री दानवे यांनी दिले. माजी आमदार कैलास गोरंट्याल यांनी विजयाचे श्रेय जालनेकरांसह, पत्रकार बांधव, पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते यांना दिले. शहरातील विविध समस्या जसे पाणी, लाईट यांची समस्या सुटलेल्या असल्यातरी अद्याप कार्य पुर्णत्वास गेलेले नाही. जालनेकरांना दररोज पाणी पुरवठा होईल या दृष्टिने महापौर व उपमहापौर यांनी कार्यरत होऊन कार्य करावे.

उपमहापौर राजेश राऊत यांनीही शहरातील समस्या सोडविण्यासाठी नेत्यांच्या मार्गदर्शनाखाली प्रयत्न करणार असल्याचे सांगितले.


संपादकीय पान

## ज्ञानाची निर्मिती, संरक्षण आणि प्रसारण करणारे जागतिक दर्जाचे विद्यापीठ

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ हे भारतातीलच नाही तर जगातील एक नावाजलेले विद्यापीठ आहे. या विद्यापीठाची स्थापना १० फेब्रुवारी १९४९ रोजी झाली म्हणजे आज हे विद्यापीठाला ७७ वर्ष पूर्ण होऊन ७८ व्या वर्षात पदार्पण करीत आहे. डॉ एम आर जयकर हे या विद्यापीठाचे पहिले कुलगुरू होते. स्थापनेनंतर १२ जिल्ह्यांमध्ये उच्च शिक्षणाच्या विविध सुविधा पुरवण्याची जबाबदारी पुणे विद्यापीठावर होती. १९६४ मध्ये कोल्हापूर येथे छत्रपती शिवाजी विद्यापीठाच्या स्थापनेनंतर पुणे, नाशिक, धुळे, जळगाव या जिल्ह्यांमधील विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठाचे कार्य सुरू झाले. १९९० साली जळगाव येथे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाची स्थापना झाल्यानंतर पुणे, नगर, नाशिक या जिल्ह्यांसह दादरा नगर हवेली या केंद्रशासित प्रदेशातील महाविद्यालये या विद्यापीठाच्या मार्गदर्शनाखाली काम करीत आहेत. २०१४ साली या विद्यापीठाचा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ असा नामविस्तार करण्यात आला. पुण्यातील गणेशखिंड रस्त्यावर पुणे विद्यापीठाचे मुख्य संकुल आहे. विद्यापीठाची मुख्य इमारत पुणेकरांसाठी शैक्षणिक अस्मितेचे प्रतीक आहे. ही इमारत ब्रिटिश गव्हर्नरांच्या पुण्यातील मुक्कामासाठी एकोणिसाव्या शतकात बांधण्यात आली होती. इटालियन शैलीत बांधण्यात आलेली ही इमारत म्हणजे पुण्याला मिळालेला ऐतिहासिक वारसा आहे. विद्यपीठाचा परिसर सुमारे ४९० एकराचा असून त्यात अनेक दुर्मिळ सुंदर आणि अतिशय मनमोहक असे वातावरण लाभले आहे. घनदाट जंगल, शोभिवंत हिरवळ, दुर्मिळ ब्रिटिशकालीन कारंजे व ऐतिहासिक अशी ब्रिटिशकालीन भव्य इमारत यामुळे हा परिसर निसर्गप्रेमी चित्रपट निर्माते, दिग्दर्शक यांचे आकर्षण केंद्र राहिला आहे. पुणे विद्यापीठात दुर्मिळ तसेच सावली देणारे मोठे वृक्ष आहेत. या वृक्षांची छाया, सौंदर्य आणि उत्साह निर्माण करणारे वातावरण विद्यार्थ्यांना अभ्यास व संशोधन करण्यास प्रोत्साहित करते. विद्यापीठातून विविध पदव्युत्तर विभाग व प्रशासकीय कार्यालयाचे कामकाज चालते. या विभागातून आज जवळपास ६ लाख विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. ४२ शैक्षणिक विभाग, १२ आंतरविद्या शाखा व सेवा युनिट, २० अध्यासने, ८ राष्ट्रीय व प्रादेशिक केंद्र आहेत. ६९६ संलग्न महाविद्यालये, २८७ मान्यताप्राप्त व्यवस्थापन संस्था, १२१ मान्यताप्राप्त संशोधनकेंद्र विद्यापीठाशी संलग्न आहेत. विद्यापीठातील विविध विभागात ६० हुन अधिक देशातील विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. आपल्या विद्यार्थ्यांना परदेशी विद्यापीठातील अभ्यासक्रमाचेही फायदे व्हावेत यासाठी गेल्या काही काळात विद्यापीठाने परदेशातील नामांकित विद्यापीठांसोबत सामंजस्य करार केले आहेत. विद्यापीठाचे पहिले कुलगुरू डॉ जयकर यांच्या नावाने ओळखले जाणारे जयकर ग्रंथालय केवळ विद्यार्थ्यांनाच नाही तर विद्यापीठाबाहेरील संशोधक व अभ्यासकांनाही खेचून आणते. जयकर ग्रंथालय हे माहिती आणि संदर्भ ग्रंथासाठी भारतातीलच नव्हे तर जगातील जगातील सर्वोत्कृष्ट ग्रंथालयांपैकी एक आहे. जयकर ग्रंथालयात भारतीय व विदेशी मासिके घेतली जातात तसेच ग्रंथालयात काही नियतकालिके मोफत मिळतात. जयकर ग्रंथालयात ५ लाखांहून अधिक पुस्तके व विविध विषयांवरील मासिके आहेत. अशा सुविधांमुळेच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ राज्यातीलच नव्हे तर देशातील विद्यार्थ्यांच्या पहिल्या पसंतीचे विद्यापीठ आहे. पुणे विद्यापीठ ज्ञानाची निर्मिती, संरक्षण आणि प्रसारण करणारे जागतिक दर्जाचे विद्यापीठ आहे.

# माझा सदगुरु रामदासा ।।

नारायण सूर्याजीपंत ठोसर म्हणजेच समर्थ रामदास म्हणजे रामदास स्वामी यांचा जन्म २४ मार्च १६०३
जांब, जिल्हा जालना येथे झाला. लहानपणी ते खोडकर होते पण अतिशय बुद्धिमान होते साहसी होते. झाडावर उड्या मारणे, पुरात पोहणे, घोड्यावर रपेट करणे, या गोष्टीत ते तरबेज होते. त्यांची आठ मित्र होते. एक सुतार ,दुसरा गवंडी, तर एक लोहाराचा, एक गवळ्याचा, आणि या मित्रांच्या सहवासात त्यांनी त्या त्या व्यवसायाचे उत्तम ज्ञान प्राप्त करून घेतले होते. निरीक्षण आणि अनुभवाने सर्व गोष्टी शिकल्या होत्या. एकदा ते लपून बसले होते, काही केल्या सापडत नव्हते. अखेर ते सापडले तेव्हा त्यांना काय करीत होतास असे विचारणार ते आईला म्हणाले मी विश्वाची चिंता करतो. तेव्हा या मुलाला संसारात अडकवले तर ताळ्यावर येईल या कल्पनेने त्यांचे वयाच्या बारावी वर्षी लग्न ठरविले. लग्नात सावधान हा शब्द उच्चारताच तो ऐकून ते नेसलेल्या व पांघरलेल्या वस्त्रांनिशी मंडपातून पळाले. लोकांनी खूप पाठलाग केला परंतु ते हाती लागली नाही.
तिथून निघून ते पायी चालत चालत पंचवटीत आले व रामाचे दर्शन घेतले. ते नाशिक टाकळीला आले .समर्थांनी बारा वर्षे तपस्या केली. तिथेही त्यांनी आपल्याला ओळखू नाही म्हणून रामदास हे नाव धारण केले. १६२१ ते १६३३ असे बारा वर्षे ते टाकळी येथे राहिले. तेथे साधना केली रोज ब्राह्म मुहुर्तावर ते सूर्यनमस्कार घालत. राम नामाचे १३ कोटी वेळा नामस्मरण करून झाल्यावर त्यांनी कार्याला आरंभ केला. त्यांनी साक्षात प्रभू रामचंद्रांना सद्गुरु मानले. तिथेच त्यांनी वेद उपनिषदे व शास्त्रे याचा अभ्यास केला. रामाची उपासना केली, प्रार्थना केली, करुणाष्टके लिहीलीत.
सदा सर्वदा योग तुझा घडावा। तुझे कारणी देह माझा पडावा। उपेक्षु नको गुणवंता अनंता। रघुनायका मागणे हेचि आता.....
तुजविण रामा मजकंठवेना
हिच ती करुणाष्टके आहेत..
आहेत बारा वर्ष तीव्र उपासना केल्यानंतर त्यांना आत्मसाक्षात्कार झाला असे म्हणतात. त्यावेळी त्यांचे वय २४ वर्षाचे होते. नाशिक टाकळी येथे त्यांनी गोमय,गाईच्या शेणापासून हनुमंताची स्थापना केली. हनुमान हे शक्तिशाली, बुद्धीची देवता आहे आणि त्यामुळे तिची उपासना केली पाहिजे असा समर्थांचा या मागचा विचार होता. इथले तपश्चर्या नंतर त्यांनी बारा वर्षे भारतभर भ्रमंती केली. निरनिराळ्या ठिकाणच्या समाजाच्या स्थितीचे निरीक्षण केले. भारतभर भ्रमंती केल्यानंतर ३६ व्या वर्षी रामदास स्वामी पैठणला परत आले व पैठणला ते एकनाथांच्या वाड्यातच उतरले होते.
।। जय जय रघुवीर समर्थ।। या गर्जनेने मरगळलेला महाराष्ट्र जागा झाला.
प्रभू श्री रामचंद्र आदिशक्ती तुळजाभवानी आणि शक्तीचे उपासनासाठी श्री हनुमंत या तीन देवतांची उपासना केली.
सामर्थ्य आहे चळवळीचे,
जो जो करील तयाचे।
परंतु, तेथे अधिष्ठान पाहिजे। भगवंताचे।



यानुसार त्यांनी भगवंतांची अधिष्ठान असलेली चळवळ
निर्माण करण्याचा प्रयत्न केला समाज प्रबोधन करण्याचे समर्थांचे मुख्य उद्दिष्ट होते .त्यांनी भक्तिमार्गाचा प्रसार केला. भक्ति केल्यामुळे देव निश्चितपणे प्राप्त होतो असे त्यांनी दासबोधात सुरुवातीला सांगितले आहे.
त्यांनी स्वतः बारा वर्षे नामस्मरण व भक्ती केली त्याचा प्रसार केला ते म्हणत ज्या घरांमध्ये रामराम नाही ते घर सोडून खुशाल अरण्यात निघून जावे.
ते महाराष्ट्रातील समर्थ संप्रदायाचे संस्थापक होते.
शुका सारखे पूर्ण वैराग्य ज्याचे
वशिष्ठा परी ज्ञानयोगेश्वराचे
कवी वाल्मीका सारखा मान्य ऐसा
नमस्कार माझा सद्गुरु रामदासा....
असे वामन पंडितांनी समर्थ रामदासांना उद्देशून लिहिले आहे.
दास मारुती, चाफळ. वीर मारुती, चाफळ. खडीचा मारुती, शिंगणवाडी, चाफळ. प्रताप मारुती, माजगाव, चाफळ. उंब्रज मारुती, तालुका कराड. शहापूर मारुती, उंब्रज जवळ. मसूर मारुती, तालुका कराड. बहे बोरगाव कृष्णामाई मारुती, जिल्हा सांगली. शिराळा मारुती,बत्तीस शिराळा, जिल्हा सांगली. मंडपाळे मारुती, जिल्हा कोल्हापूर. पारगाव मारुती, जिल्हा कोल्हापूर. अशा अकरा मारुतीची स्थापना त्यांनी केली. गावोगावी मारुतीची मंदिरे बांधली. मारुती शक्ती देवता असल्याने मंदिराच्या परिसरात ते तरुणांना संघटित करीत आणि व्यायामाची प्रेरणा देत होते.
समर्थ रामदासांनी अकरा मारुती स्थापना केली तसेच
जांब,. चाफळ ,सज्जनगड ,डोणगाव, शिरगाव, कनेरी ,या ठिकाणी मठाची स्थापना केली.समर्थांनी हजारचे जवळपास मंदिरे, मठ, स्थापन केले.
श्रीक्षेत्र काशी विश्वनाथ ,वाराणसी दशाश्वमेध घाट येथे श्रीसमर्थ सद्गुरू रामदास स्वामीनी श्रीहनुमान मारुती मंदिर, गोमय मारुती मंदिर स्थापन केले.
समाजाविषयीच्या चळवळीतून समर्थांनी मोठीच वांग्मय निर्मिती केली.ग्रंथराज दासबोध, मनाचे श्लोक, करुणाष्टके, आत्माराम, भीमरूपी स्तोत्र, गणपतीची आरती, शंकराची आरती,देवीची आरती, याची रचना केली. समर्थ रामदासांनी जवळपास ८० ते ९० आरत्या लिहिले आहेत.
ग्रंथराज दासबोध या ग्रंथाची निर्मिती लिखाण शिवथरघळ येथे केली. आपल्या ग्रंथाच्या माध्यमातून जीवनात आलेल्या अनेक अनुभवातून समर्थ रामदासांनी लोकांना समाजात कसे राहावे कसे वागावे याविषयी अनेक प्रकारांनी मार्गदर्शन केले आहे व संदेश दिले आहेत.
मना सज्जना भक्ती पंथेची जावे
तरी श्रीहरी पावी जे तो स्वभावे
जनी निंद्य ते सर्व सोडूनि द्यावे
जनी वंद्य ते सर्व भावे करावे.....
असे २०५ मनाचे श्लोक लिहिलेत.. त्या प्रत्येकात त्यांनी मार्गदर्शन केले आहे.
समर्थांनी राष्ट्र उभारण्यासाठी कार्य केले तसेच लोकशिक्षण, प्रपंच, परमार्थ, विवेक, यावर भर दिला. कारण यातूनच राष्ट्र उभे राहते स्वराज्य स्थापन होते लोकांनी साक्षर व्हावे यासाठी त्यांनी लिहिण्याची वाचण्याची सवय लागावी..
म्हणून ते म्हणतात
दिसा माजी काहीतरी लिहावे
प्रसंगी अखंडित वाचीत जावे.. पुढे म्हणतात
जे जे आपणासी ठावे तेथे शिकवावे
शहाणे करून सोडावे सकाळ जन.
पुढे ते म्हणतात प्रपंच सोडून परमार्थ केला तर केवळ आत्मांनद होईल, परंतु प्रपंच करून परमार्थ केला तर राष्ट्रोन्नती होईल म्हणूनच...
प्रपंची जे सावधान । तोचि परमार्थ करील जाण।
प्रपंची जो अप्रमाण। तो परमार्थी खोटा।।
छत्रपती शिवाजी महाराज हे समर्थ रामदास स्वामींच्या विचाराचे होते तसेच स्वराज्य रक्षणासाठी समर्थ शिवाजी महाराज सोबत होते. ३१ नोव्हे.१६७८ मध्ये समर्थ रामदास स्वामींना एक विस्तृतक्ष पत्र लिहून काही गावे भेट म्हणून दिली होती अशीही नोंद आहे.
निश्चयाचा महामेरू, बहुत जनांसी आधारू अखंड स्थितीचा निर्धारु, श्रीमंत योगी, यशवंत ,कीर्तीवंत, सामर्थ्यवंत, वरदवंत, पुण्यवंत ,नीतीवंत, जाणता राजा असे छत्रपती शिवाजी महाराजांचे वर्णन समर्थ रामदासांनी केले आहे.
श्रीसमर्थ रामदासांनी आपल्या मठांमध्ये जे नियम घालून दिले होते त्यापैकी एक नियम होता, रामदासी संप्रदायातील अनुग्रहित किंवा उपासक स्त्रियांना मठातील स्वयंपाक वा स्वयंपाकाशी संबंधित कोणतीही कामे न देण्याचा. त्यामुळे मठात स्वयंपाक करण्यापासून ते जेवण वाढण्यापर्यंतची सर्व कामे पुरुष उपासकच करत. नित्यनियमाने त्यांच्याकडून केली जाणारी स्वयंपाकादी कामे किंवा स्वच्छतेची कामे स्त्रियांना न देण्याचा आणि अन्य महत्त्वाच्या क्षेत्रातील कामे करण्याचा पायंडाच श्रीसमर्थांनी आपल्या मठांमध्ये पाडला.
याशिवाय, उपासक म्हणून रामदासी मठांमध्ये आलेल्या स्त्रियांना लिहिण्या-वाचण्यासारखी बौद्धिक व दफ्तरी कामे देण्याचा नियम श्रीसमर्थांनी आखून दिला होता. हा नियम देशभरातील आठ राज्यात शिल्लक असलेल्या २५० हून अधिक मठांमधून आजही पाळला जातो !
पुरुषांप्रमाणेच स्त्रियांनाही परमार्थाचा अधिकार आहे असे श्रीसमर्थांचे मत होते. स्त्रियांनी धर्म आणि अध्यात्म या दोन्ही ठिकाणी नेतृत्व करावे अशी एक वेगळीच भूमिका श्रीसमर्थ रामदासांनी मांडली होती आणि त्यानुसार त्यांनी आचरणही केले. मठांवर मठाधिपती म्हणून श्रीसमर्थांनी स्त्रियांची नेमणूक केली. ज्या स्त्रियांना लिहिता- वाचता येत नसे त्यांना रामदासी मठामध्ये लिहायला व वाचायला शिकविले जाई. लिहिण्या-वाचण्यास आल्यानंतर त्या स्त्रियांना विविध ग्रंथांचा अभ्यास, पारायणे, जप-जाप्य -अनुष्ठाने करू दिली जात. उपासक स्त्रियांना लिहिण्या-वाचण्यास शिकवून श्रीसमर्थांनी स्त्रियांचे सबलीकरण केले !
सातारा जिल्ह्यातील सज्जनगड हे महाराष्ट्रातील समर्थ संप्रदायाचे पवित्र क्षेत्र आहे. या ठिकाणी शके १६०३, सन १६८१ रोजी माघ वद्य नववीला रामदास स्वामींनी समाधी घेतली. शेवटचे पाच दिवस त्यांनी श्रीरामाचे मूर्ती समोर बसून निर्जल उपावास केला. राम राम जप करीत पद्मासनामध्ये बसून ते ब्रह्मलीन झाले. त्याच ठिकाणी हि समाधी आहे म्हणून या तिथीला दासनवमी असे म्हणतात. या समाधीवर रामाची मूर्ती बसवून देऊळ बांधले आहे. दास नवमीला या ठिकाणी म्हणजे सज्जनगडावर अनेक ठिकाणाहून लाखोच्या संख्येने भाविक आपली हजेरी लावतात.दर्शनाचा लाभ घेतात.
।। जय जय रघुवीर समर्थ.।।

**दिलीप देशपांडे.**
**जामनेर. जि.जळगांव.**
**मोबा.८९९९५६६९१७**
dilipdeshpande24gmail.com

# निकालापर्यंतचा वेळ कौशल्य आत्मसात करण्यासाठी सार्थकी लावावा- प्रा. झांजरी

## जेईएफच्या मोफत शिकवणी प्रकल्पातील बारावीच्या विद्यार्थ्यांना निरोप




**जालना । प्रतिनिधी -** बारावीच्या परीक्षेनंतर निकालापर्यंतचा काळ वाया न घालवता संगणक आणि इंग्रजी संभाषण यांसारखी कौशल्ये आत्मसात करावीत, असे आवाहन जालना एज्युकेशन फाऊंडेशनचे फाऊंडेशनचे विश्वस्त प्रा. ओमप्रकाश झांजरी यांनी येथे बोलताना केले.

आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसाठी जालना एज्युकेशन फाऊंडेशन संचलित आणि नथुमल वासुदेव अँड कंपनीचे महेश नाथानी व नाथानी परिवार आणि स्व. हेमिना दिनेश शाह यांच्या स्मृत्यर्थ प्रायोजित मोफत शिकवणी प्रकल्पातील इयत्ता बारावी कॉमर्सच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ उत्साहात पार पडला. त्याप्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून प्रा. झांजरी बोलत होते. व्यासपीठावर जालना एज्युकेशन फाऊंडेशनचे स्टाफ इन्चार्ज दिलीप केंद्रे आणि कॉर्डिनेटर रुक्मिणीकांत दीक्षित यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रा. झांजरी पुढे म्हणाले की, आजच्या युगात ज्याला संगणक येत नाही तो अशिक्षित समजला जातो. बारावीची परीक्षा झाल्यानंतर निकालापर्यंतचा दोन ते अडीच महिन्यांचा काळ हा मौज-मजा करण्यासाठी नसून स्वतःला घडवण्यासाठी आहे. विद्यार्थ्यांनी या काळात संगणकाचे ज्ञान घ्यावे आणि इंग्रजी बोलण्याचा सराव करावा. ही कौशल्ये आत्मसात केल्यास भविष्यात नोकरीच्या संधी सहज उपलब्ध होतील. मुलींनी शिक्षण अर्धवट सोडू नये आणि पालकांनीही त्यांच्या लग्नाची घाई न करता त्यांना पायावर उभे राहण्यासाठी सहकार्य करावे, असेही त्यांनी आवर्जून सांगितले. दिलीप केंद्रे यांनी शाळेत आणि अभ्यासात जी मुले शिस्त पाळतात, तीच आयुष्यात यशस्वी होतात. फाउंडेशनने दिलेली ही मोफत शिक्षणाची संधी विद्यार्थ्यांनी सार्थकी लावावी आणि भविष्यात जालन्याचे नाव उज्ज्वल करावे, असे ते म्हणाले. रुक्मिणीकांत दीक्षित यांनी बारावी हे जीवनातील महत्त्वाचे वळण आहे. इथून पुढे तुम्ही ज्या वाटेने जाल, तिथे तुमचे ध्येय निश्चित असले पाहिजे. तुम्ही कितीही मोठे झाले तरी चांगले माणूस बना. केवळ पदवी मिळवणे म्हणजे शिक्षण नव्हे, तर मिळालेल्या ज्ञानाचा समाजासाठी उपयोग करणे हीच खरी शिकवण आहे. यावेळी हेमलता पेंबार्ती, शिकवणी प्रकल्पाचे शिक्षक शिवम तांबट, वैशाली दोडके आणि संस्कृती संगम यांनी आपले अनुभव व्यक्त करत विद्यार्थ्यांना भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांनीही फाउंडेशनमुळे कठीण विषय सोपे झाल्याचे सांगत संस्थेचे आभार मानले.

या कार्यक्रमास जेईएफ स्टाफचे सतीश काळे, विजय कसबे, उमेश पाटील, तेजस अग्रवाल, लक्ष्मी यादव, माधुरी झंवर, मोनिका यादव, सुजाता भुरेवाल, अंचल वर्मा यांच्यासह प्रकल्पातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मार्कंडेनगर येथे सिमेंट कॉंक्रिट रस्त्याचे उद्घाटन आमदार अर्जुनराव खोतकर यांच्या हस्ते विकासकामांचा शुभारंभ



**जालना । प्रतिनिधी -** मार्कंडेनगर परिसरातील नागरिकांसाठी अत्यंत महत्त्वपूर्ण ठरणाऱ्या विकासकामांचा शुभारंभ आज मोठ्या उत्साहात पार पडला. मार्कंडेनगर येथे सिमेंट कॉंक्रिट रस्त्याचे भूमिपूजन उद्घाटन शिवसेना उपनेते तथा आमदार अर्जुनरावजी खोतकर यांच्या शुभहस्ते करण्यात आले.

या विकासकामांमुळे परिसरातील नागरिकांना दैनंदिन ये-जा करण्यासाठी भेडसावणाऱ्या अडचणी दूर होणार असून, विशेषतः पावसाळ्यात निर्माण होणाऱ्या गैरसोयींवर कायमस्वरूपी तोडगा निघणार आहे. तसेच संरक्षण भिंत उभारल्यामुळे नागरिकांच्या घरांचे व मालमत्तेचे संरक्षण होणार असून सुरक्षिततेच्या दृष्टीने हे काम अत्यंत महत्त्वाचे असल्याचे यावेळी उपस्थितांनी नमूद केले.

उद्घाटनप्रसंगी आमदार अर्जुनराव खोतकर यांनी उपस्थित नागरिकांशी संवाद साधत शासन व शिवसेनेच्या माध्यमातून सुरू असलेल्या विविध विकासकामांची माहिती दिली. विकास हाच आमचा ध्यास आहे. सामान्य नागरिकांच्या मूलभूत सुविधा सक्षम करण्यासाठी रस्ते, संरक्षण भिंती, पाणीपुरवठा व इतर नागरी सुविधा यांना प्राधान्य देत सातत्याने काम सुरू आहे. नागरिकांच्या समस्या समजून घेऊन त्या लवकरात लवकर सोडविण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत असे आमदार खोतकर यांनी यावेळी स्पष्ट केले.

या उद्घाटन सोहळ्यास शिवसेना जिल्हा संपर्कप्रमुख भास्करराव अंबेकर, शिवसेना संपर्कप्रमुख पंडितदादा भुतेकर, जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे, शहरप्रमुख महिला आघाडी उज्वलाताई फोपलिया, सखाराम लंके, दीपक हवाले, लखन कनिशे, स्वप्निल भिसे, बबन शेळके, आक्कु भैय्या, निरज मंत्री, भगवानराव मांटे, दिलीप रोहीनकर, दिलीप ठाकूर, सराफ काका, पी. जी. पाटील, तेलंगे सर, खेडवाल साहेब, बायस साहेब, चमनसिंग ठाकूर, दिलीप मीहिते, कोरडे साहेब, संतोष शेठ, फोपलिया दवणे, सचिन शर्मा, खडागळे साहेब, मनवर साहेब, भोला कांबळे, रविकांत जगधने, ममता खरात, मिराताई मोहिते, कोरडे ताई, मंदाताई तेलंगे, खेत्रे ताई, रोहीनकर ताई यांच्यासह शिवसैनिक, पदाधिकारी व मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

या विकासकामांमुळे परिसराच्या सर्वांगीण विकासाला गती मिळणार असून नागरिकांनी आमदार अर्जुनराव खोतकर यांचे आभार व्यक्त केले.

# जालना जिल्हाधिकाऱ्यांना अजित पवार विमान दुर्घटना चौकशीची मागणी




**जालना । प्रतिनिधी** - सामाजिक कार्यकर्ते राहुल सत्यनारायण करनाडे यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात एक निवेदन सादर करून, २८ जानेवारी २०२६ रोजी बारामती येथे घडलेल्या भीषण विमान दुर्घटनेत महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या असामयिक निधनाबाबत गहन आणि पारदर्शक चौकशीची मागणी केली आहे. या दुर्घटनेत अजित पवार यांच्यासह विमानातील इतर चार जणांचाही मृत्यू झाला असून, संपूर्ण राज्यात शोककळा पसरली आहे.

राहुल करनाडे यांनी निवेदनात म्हटले आहे की, मुंबईहून बारामतीकडे जाणाऱ्या चार्टर विमानाचा (Learjet ४५, रजिस्ट्रेशन VT-SSK) बारामती विमानतळावर लँडिंगदरम्यान अपघात झाला. विमान रनवेपासून फिसलले, आग लागली आणि भीषण स्फोट झाला. अपघाताचे नेमके कारण (तांत्रिक बिघाड, देखभाल, सुरक्षा प्रोटोकॉल, हवामान इत्यादी) अद्याप स्पष्ट झालेले नाही. DGC- आणि --IB यांच्याकडून तपास सुरू असला तरी, लोकांमध्ये अनेक शंका आणि चर्चा आहेत.

निवेदनातील प्रमुख मागण्या खालीलप्रमाणे आहेत:

दुर्घटनेची तात्काळ उइख किंवा उच्चस्तरीय स्वतंत्र समितीमार्फत पारदर्शक चौकशी करावी. DGC- नियमांचे पालन, विमानाची देखभाल, पायलट प्रशिक्षण आणि सुरक्षा प्रोटोकॉल यांचा सखोल अभ्यास व्हावा.

महाराष्ट्रातील नेते आणि जनप्रतिनिधींच्या (विशेषतः बहुजन/OBC/SC/ST पार्श्वभूमीच्या) प्रवासासाठी कठोर सुरक्षा प्रोटोकॉल आणि सरकारी विमान/हेलिकॉप्टर व्यवस्थेची अंमलबजावणी करावी. पीडित कुटुंबीयांना (सुनेत्रा पवार, पार्थ पवार इत्यादी) तात्काळ मदत आणि Montreal Convention १९९९ तसेच DGC- नियमांनुसार किमान ११ कोटी रुपयांची योग्य नुकसान भरपाई मिळेल याची खात्री करावी.

अपघाताचे नेमके कारण, जबाबदारी निश्चिती आणि भविष्यातील प्रतिबंधक उपाययोजनांचा पूर्ण सार्वजनिक अहवाल प्रसिद्ध करावा.

जिल्ह्यातील विमानतळ आणि प्रवास सुरक्षा यंत्रणेची तात्काळ तपासणी करावी.

करनाडे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि कांशीराम यांच्या विचारसरणीचा उल्लेख करत सांगितले की, अशा घटना बहुजन समाजाच्या नेतृत्वाला धोका पोहोचवणाऱ्या ठरू शकतात. भारतीय संविधानाच्या कलम १४ (समानता) आणि कलम २१ (जीवन आणि वैयक्तिक स्वातंत्र्याचा हक्क) नुसार, प्रत्येक जनप्रतिनिधीला सुरक्षित प्रवासाचा हक्क आहे. ही चौकशी त्वरित, निष्पक्ष आणि पूर्ण पारदर्शक व्हावी, अशी त्यांची विनंती आहे.

या निवेदनासोबत विजय ओमप्रकाश भगत उपस्थित होते. निवेदन जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आवक-जावक विभागात नोंदवले असून, त्याची प्रतिलिपी मुख्यमंत्री कार्यालय, DGC-, पंतप्रधान कार्यालय, गृहमंत्रालय, मुख्य सचिव आणि पुणे जिल्हाधिकारी यांना पाठवण्यात येणार आहे.

जिल्हाधिकाऱ्यांकडून या निवेदनावर लवकरच लेखी उत्तर अपेक्षित आहे.

### वाघ्रूळ शिवारात नीलगाय रक्तबंबाळ

# पोलीस-वन विभाग तीन तास बेपत्ता, गौरक्षकांनी वाचवला जीव!

### ११२ वर कॉल, वन विभागाला फोन तरीही शून्य प्रतिसाद! प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे जखमी नीलगाय मृत्यूच्या दाढेत

**जालना । प्रतिनिधी** - जालन्यातील देऊळगाव राजा रोडवर वाघ्रूळ शिवारात रविवारी रात्री सुमारे आठ वाजण्याच्या सुमारास दोन ते तीन वाहनांच्या धडकेत एक नीलगाय गंभीर जखमी झाल्याची धक्कादायक घटना घडली. अपघातानंतर नीलगाय रक्ताच्या थारोळ्यात तडफडत पडलेली असताना प्रशासन मात्र अक्षरशः गायब होते.

घटनेची माहिती मिळताच गौरक्षकांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत ११२ वर कॉल करून पोलिसांना माहिती दिली. मात्र तब्बल तीन तास उलटूनही एकही पोलीस कर्मचारी घटनास्थळी फिरकला नाही.

यानंतर वन विभागाच्या कर्मचाऱ्यांना संपर्क केला असता, प्रत्यक्ष मदत करण्याऐवजी वेगवेगळे मोबाईल नंबर देत गौरक्षकांची दिशाभूल करण्यात आली.

इतकेच नव्हे तर वन विभागाच्या प्रमुख अधिकाऱ्यांना फोन केल्यानंतरही कारणे सांगत जबाबदारी झटकण्याचा प्रकार समोर आला. परिणामी रात्री साडेअकरा वाजेपर्यंत ना पोलीस, ना वन विभाग - कोणाचाही ठोस प्रतिसाद मिळाला नाही.

दरम्यान नीलगायच्या जिभेवर व जबड्यावर गंभीर जखमा झालेल्या होत्या. परिस्थिती गंभीर असल्याने गौरक्षकांनी स्वतःहून जनावरांचे डॉक्टर बोलावून जागेवरच प्राथमिक उपचार केले. डॉक्टरांनी जखमांवर टाके घालून नीलगायचा जीव वाचवला.

साडेअकरा वाजता वन विभागाचा एक कर्मचारी कुत्रे पकडण्याच्या वाहनासह घटनास्थळी पोहोचला, मात्र



नीलगाय मोठी असल्याने त्या वाहनातून हलवणे शक्य नसल्याचे स्पष्ट झाले. अखेर गौरक्षकांनीच जबाबदारी स्वीकारत नीलगायला सुरक्षित ठिकाणी हलवले.

या संपूर्ण प्रकारामुळे परिसरातील नागरिक आणि गौरक्षकांमध्ये पोलीस प्रशासन व वन विभागाच्या बेजबाबदारपणाबाबत तीव्र संताप व्यक्त करण्यात येत आहे.

जर गौरक्षक वेळेवर पुढे आले नसते, तर नीलगायचा मृत्यू निश्चित होता, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

यावेळी जिल्हा गौरक्षा प्रमुख व्यंकटेश धन्नूलालजी भगत, किरण देशमुख, सुजीत जोशी, सुयोग सुराना, वंश यादव, विलास साळुंके, अमोल श्रीराम खरात, अविनाश दीपक गाढे, ऋषिकेश पंढरीनाथ खरात, कार्तिक विठ्ठल खांडेभराड यांच्यासह परिसरातील नागरिकांनी मदतकार्य केले.

# पत्नीचे खाजगी फोटो तिच्या संमतीशिवाय घेणे आणि प्रसारित करण्याची धमकी देणे ही क्रूरता

### ॲड. महेश धन्नावत (कार्याध्यक्ष, नोटरी असोसिएशन) यांचे विधान

झारखंड उच्च न्यायालयाने दिलेला हा निकाल अत्यंत महत्त्वपूर्ण आणि स्वागतार्ह आहे. हा निकाल वैवाहिक संबंधांमध्ये सन्मान आणि गोपनीयतेच्या अधिकाराला अधोरेखित करतो. कोणत्याही व्यक्तीला, अगदी पतीलाही, आपल्या पत्नीच्या खाजगी आयुष्यात डोकावण्याचा आणि तिची प्रतिष्ठा भंग करण्याचा अधिकार नाही. तंत्रज्ञानाचा वापर करून अशा प्रकारे मानसिक छळ करणे हे शारीरिक हिंसेपेक्षा कमी नाही. या निकालामुळे पीडित महिलांना न्याय मिळण्यास आणि अशा प्रकारच्या डिजिटल अत्याचाराला आळा घालण्यास निश्चितच मदत होईल. कौटुंबिक कायद्याच्या कक्षेत 'क्रूरता' या संकल्पनेला अधिक व्यापक आणि समकालीन अर्थ देणारा हा एक प्रगतीशील निर्णय आहे.

पत्नीच्या मोबाईलमधून तिचे खाजगी फोटो तिच्या नकळत घेणे आणि ते सोशल मीडियावर प्रसारित करण्याची धमकी देणे, हे हिंदू विवाह कायद्यानुसार 'क्रूरता' आहे, असा महत्त्वपूर्ण निकाल झारखंड उच्च न्यायालयाने दिला आहे. पतीच्या अशा वागण्यामुळे पत्नीच्या चारित्र्यावर शिंतोडे उडतात आणि ही कृती मानसिक छळाच्या व्याख्येत येते, असे न्यायालयाने स्पष्ट केले. न्यायमूर्ती सुजित नारायण प्रसाद आणि न्यायमूर्ती अरुण कुमार राय यांच्या खंडपीठाने कौटुंबिक न्यायालयाचा निर्णय रद्द करत पत्नीच्या घटस्फोटाच्या मागणीला मान्यता दिली. सदर प्रकरणात, पीडित पत्नीने हिंदू विवाह कायद्याच्या कलम १३(१)(आयए) अंतर्गत क्रूरतेच्या आधारावर घटस्फोटासाठी अर्ज केला होता. लग्नानंतर काही दिवसातच, पतीने झोपेत असताना तिच्या मोबाईलमधील गुगल ड्राईव्हवर असलेले काही खाजगी फोटो पाहिले. हे फोटो त्याने स्वतःच्या मोबाईलमध्ये घेतले आणि ते सोशल मीडियावर टाकण्याची धमकी देऊ लागला. यानंतर तो पत्नीला सातत्याने शारीरिक आणि मानसिक त्रास देत होता, तसेच तिच्या इच्छेविरुद्ध लैंगिक संबंध ठेवत होता, असा आरोप पत्नीने केला होता. याउलट, पतीने असा दावा केला की, लग्नानंतर त्याची पत्नी रात्री उशिरापर्यंत दुसऱ्या व्यक्तीशी बोलत असे. याबद्दल विचारणा केली असता, तिने दुसऱ्या व्यक्तीसोबत संबंध असल्याची कबुली दिली. पतीने हेच फोटो आपल्या कुटुंबीयांना दाखवले, त्यानंतर त्यांनीही पत्नीचा अपमान केला. या सर्व प्रकारामुळे पत्नीची समाजात बदनामी झाली आणि तिचे चारित्र्यहनन झाले, असे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले. उच्च न्यायालयाने स्पष्ट केले की, क्रूरता ही केवळ शारीरिकच नसते, तर मानसिक स्वरूपाचीही असू शकते. एखाद्या व्यक्तीच्या प्रतिष्ठेला धक्का पोहोचवणे, हे देखील क्रूरतेचेच एक रूप आहे. या प्रकरणात, पतीने पत्नीचे खाजगी फोटो तिच्या परवानगीशिवाय घेऊन आणि ते सार्वजनिक करण्याची धमकी देऊन मानसिक क्रूरता केली आहे. पतीची ही वागणूक पत्नीच्या मनात भीती निर्माण करणारी आणि तिच्यासोबत राहणे हानिकारक आहे, हे सिद्ध करते.

न्यायालयाने कौटुंबिक न्यायालयाचा निर्णय बाजूला ठेवत पत्नीचा घटस्फोटाचा अर्ज मंजूर केला. या निकालाने वैवाहिक नात्यात एकमेकांच्या खासगी आयुष्याचा आणि प्रतिष्ठेचा सन्मान करणे किती महत्त्वाचे आहे, हे पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे. तंत्रज्ञानाच्या युगात डिजिटल माध्यमातून होणाऱ्या छळाला देखील कायद्याच्या चौकटीत गंभीर गुन्हा मानले जाईल, असा स्पष्ट संदेश या निकालातून मिळतो.



# कृषीप्रधान भारतासाठी 'एआय' तंत्रज्ञान मैलाचा दगड ठरेल - जिल्हाधिकारी आशिमा मित्तल

## कृषी क्षेत्रातील क्रांतीसाठी 'कृत्रिम बुद्धिमत्ता' प्रभावी शस्त्र;चॅटजीपीटी म्हणजे एआय नव्हे - सीईओ आनंद माहुरकर

**जालना । प्रतिनिधी -** सध्याच्या धावपळीच्या युगात प्रत्येक गोष्टीतील बारकावे मानवी बुद्धिमत्तेत साठवून ठेवणे आणि ते वेळेवर आठवणे कठीण झाले आहे. अशा परिस्थितीत माहितीचे अचूक विश्लेषण करण्यासाठी 'कृत्रिम बुद्धिमत्ता' अत्यंत महत्त्वाची ठरत आहे. भारतातील संगणक क्रांतीनंतरचा हा सर्वात मोठा बदल असून कृषीप्रधान भारतासाठी एआय तंत्रज्ञान मैलाचा दगड ठरेल, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियोजन सभागृहात कृत्रिम बुध्दीमत्तेद्वारे कृषी तंत्रज्ञानाची प्रगती या विषयावर कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. यावेळी त्या बोलत होत्या. या कार्यक्रमास प्रमुख्य वक्ते म्हणून फाइंडॅबिलिटी सायन्सचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद माहुरकर, मॅजिकचे मकरंद कुलकर्णी, रितेश मिश्रा, डॉ.प्रसन्न भोगले यांच्यासह डॉ.मंदार कुलकर्णी, डॉ.दीपक बोरनारे, डॉ. गोपाळ शिंदे, प्रसाद कोकिल, सौरभ कदम, पुजा गोशेर, पी.टी.यशराज, मॅजिकचे व्यवस्थापक डी.एम.राठोड यांची प्रमुख उपस्थिती होती.



जिल्हाधिकारी आशिमा मित्तल म्हणाल्या की, भारत हा कृषिप्रधान देश असल्याने शेतीमधील पिकांचे नियोजन, हवामानाचा अंदाज आणि कीड नियंत्रण यासाठी एआय तंत्रज्ञान मार्गदर्शक ठरत आहे. मानवी बुद्धिमत्तेला मर्यादा आहेत, मात्र कृत्रिम बुद्धिमत्ता अमर्याद असून ती अचूक निर्णय प्रक्रियेत मोठी मदत करते. कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून शेतीमधील उत्पादन कसे वाढवता येईल आणि जोखीम कशी कमी करता येईल, यासाठी शेतकऱ्यांनी कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करावा. असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

फाइंडॅबिलिटी सायन्सचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद माहुरकर म्हणाले, मानवी बुद्धिमत्ता जे सांगू शकत नाही, ते एआय सांगू शकते. शेतीमध्ये विविध ऋतूंमध्ये काढलेली छायाचित्रे हा केवळ डेटा नसून, त्यापासून शिकणारी मशिन भविष्यातील संकटांचा अंदाज देऊ शकते. अन्नाची वाढती मागणी, हवामानातील अनिश्चितता आणि बाजारातील चढ-उतार यावर मात करण्यासाठी एआय माहितीचे अचूक विश्लेषण करते. यामुळे पिकांच्या आरोग्याशी संबंधित समस्या तात्काळ शोधणे शक्य होते. सध्याच्या काळात प्रत्येक गोष्टीतील बारकावे मानवी स्मरणात ठेवणे कठीण झाले असून, कृत्रिम बुद्धिमत्ता ही काळाची गरज बनली आहे. मात्र, आपल्याकडे 'चॅटजीपीटी'लाच एआय समजले जाते, ही चुकीची संकल्पना आहे. वास्तवत: एआय ही कोणतीही जादू नसून ती माहिती विश्लेषणाद्वारे अचूक निर्णय घेण्याचा एक सक्षम पर्याय आहे. तरी कृषी क्षेत्रातील क्रांतीसाठी 'कृत्रिम बुद्धिमत्ता' प्रभावी शस्त्र आहे, असेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

या कार्यशाळेतून कृषी क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्याबाबत सखोल मार्गदर्शन करण्यात आले. शेतकऱ्यांना आणि कृषी क्षेत्राशी संबंधित घटकांना आधुनिक तंत्रज्ञानाची ओळख करून देणे, हा या कार्यशाळेचा मुख्य उद्देश होता. कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून शेतीमधील उत्पादन कसे वाढवता येईल आणि जोखीम कशी कमी करता येईल, यावर यावेळी सविस्तर चर्चा करण्यात आली. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन मॅजिकचे व्यवस्थापक डी. एम. राठोड यांनी केले. या कार्यक्रमास कृषी उद्योजक, स्टार्टअप्स, संशोधक, तज्ज्ञ, शेतकरी, विद्यार्थी यांची उपस्थिती होती.

# परीक्षा ही सुंदर प्रवासाची सुरुवात; आत्मविश्वासाने सामोरे जा

## शिक्षण मंत्री दादा भुसे यांचा विद्यार्थ्यांना प्रेरणादायी संदेश

**मुंबई -** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने घेण्यात येणाऱ्या इयत्ता दहावी आणि बारावीच्या परीक्षा उद्यापासून टप्प्याटप्प्याने सुरू होत आहेत. या महत्त्वाच्या शैक्षणिक टप्प्यावर राज्यातील लाखो विद्यार्थ्यांना धीर देण्यासाठी आणि त्यांचा उत्साह वाढवण्यासाठी राज्याचे शालेय शिक्षण मंत्री माननीय दादाजी भुसे यांनी एका विशेष व्हिडिओ संदेशाद्वारे संवाद साधला आहे. परीक्षा म्हणजे आयुष्याचा शेवट नसून एका सुंदर प्रवासाची ही सुरुवात आहे, त्यामुळे विद्यार्थ्यांनी कोणत्याही दडपणाशिवाय आत्मविश्वासाने या परीक्षेला सामोरे जावे, असे आवाहन त्यांनी यावेळी केले. राज्यात १० फेब्रुवारीपासून इयत्ता १२ वीच्या आणि २० फेब्रुवारीपासून इयत्ता १० वीच्या परीक्षांना प्रारंभ होत आहे. या पार्श्वभूमीवर बोलताना शिक्षण मंत्री श्री . भुसे म्हणाले की, विद्यार्थी, शिक्षक आणि पालकांनी गेल्या अनेक महिन्यांपासून या परीक्षेसाठी मोठी मेहनत घेतली आहे. विद्यार्थ्यांच्या कष्टाला आणि जिद्दीला नक्कीच यश मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.



**पालकांच्या स्वप्नांची जाणीव**

विद्यार्थ्यांना भावनिक साद घालताना श्री.दादाजी भुसे म्हणाले, जेव्हा तुम्ही परीक्षा केंद्रावर उत्तरपत्रिका लिहायला बसता, तेव्हा तुमच्या हातात केवळ कागद नसतो, तर त्यामध्ये तुमच्या आई-वडिलांनी पाहिलेली स्वप्ने दडलेली असतात. ही स्वप्नपूर्ती करण्यासाठी तुम्ही अहोरात्र कष्ट केले आहेत. त्यामुळे स्वतःच्या क्षमतेवर पूर्ण विश्वास ठेवा.

**आरोग्य आणि सकारात्मकतेचा मंत्र**

परीक्षेच्या काळात विद्यार्थ्यांचे शारीरिक आणि मानसिक आरोग्य उत्तम राहणे आवश्यक असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. विद्यार्थ्यांनी सकारात्मक विचार करावा, पुरेशी झोप घ्यावी आणि सकस आहार घ्यावा, असा सल्ला त्यांनी दिला आहे. मन शांत ठेवून आणि हसतमुख राहून पेपर लिहिल्यास परीक्षेचा ताण जाणवणार नाही, असेही त्यांनी आवर्जून सांगितले.

**वेळेचे पालन आणि प्रामाणिकपणा**

परीक्षेच्या शिस्तीबाबत मार्गदर्शन करताना त्यांनी विद्यार्थ्यांना परीक्षा केंद्रावर वेळेत पोहोचण्याचे आवाहन केले. तुम्ही या देशाचे भविष्य आहात आणि तुमचा प्रामाणिकपणा हीच तुमची खरी ओळख आहे, अशा शब्दांत त्यांनी विद्यार्थ्यांचे मनोबल उंचावले. शेवटी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार आणि संपूर्ण राज्य शासनाच्या वतीने त्यांनी सर्व परीक्षार्थींना उज्वल यशासाठी मनापासून शुभेच्छा दिल्या. आपल्या कष्टाच्या जोरावर विद्यार्थी राज्याचे नाव नक्कीच उज्ज्वल करतील, असा आशावाद त्यांनी व्यक्त केला.

### मराठा क्रांती मोर्चा शिवजन्मोत्सव समिती जाहीर

# अध्यक्षपदी विश्वंभर तिरुखे, स्वागताध्यक्ष अरविंद देशमुख

**जालना । प्रतिनिधी -** विश्ववंदनीय, हिंदवी स्वराज्याचे संस्थापक, रयतेचे राजे, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त मराठा क्रांती मोर्चा प्रणित सार्वजनिक शिवजन्मोत्सव समिती जाहीर करण्यात आली असून अध्यक्षपदी विश्वंभर तिरुखे पाटील, स्वागताध्यक्षपदी अरविंद देशमुख, सचिव रोहित देशमुख, कार्याध्यक्ष अंकुश राजगिरे, किरण शिरसाठ, तर कोषाध्यक्षपदी सागर पाटील यांची निवड करण्यात आली आहे.

शिवजन्मोत्सव सोहळा समिती गठित करण्यासाठी मराठा सेवा संघाच्या सभागृहात नुकतीच बैठक घेण्यात आली. यावेळी अशोक पडूळ, किशोर मरकड ,करण जाधव, काकासाहेब खरात, कृष्णा पडूळ, सुभाष चव्हाण आदींची उपस्थिती होती.

उर्वरित कार्यकारणीत संघटकः योगेश पाटील, मंगेश मोरे, गोविंद चित्राल, सहसचिव अमोल भोसले,

उपाध्यक्ष शुभम टेकाळे, महेश नागवे, शुभम देशमुख, सह कोषाध्यक्ष अजय शिंदे,





सदस्य अर्जुन गायकवाड, ड .शैलेश देशमुख, प्रा. संतोष कऱ्हाळे , आकाश जगताप, शेख इब्राहिम, सचिन क्षीरसागर, सुनील रत्नपारखे, राजेंद्र जाधव, धनंजय पोहेकर आदींचा समावेश आहे.

दरम्यान यंदा शिवजन्मोत्सव सोहळ्यात शाहिरी पोवाडे, नाशिक येथील ढोल पथक, उज्जैनचे डमरू पथक , शिवस्मारकाजवळ आकर्षक विद्युत रोषणाई केली जाणार असल्याचे अध्यक्ष विश्वंभर तिरुखे पाटील यांनी सांगितले.

### राज्यातील पाणीपुरवठा व स्वच्छता कंत्राटी कर्मचारी धडकणार मुंबईत

# संपूर्ण मागण्या मान्य होईपर्यंत माघार नाही - रमाकांत गायकवाड

**जालना । प्रतिनिधी -** राज्यातील पाणीपुरवठा व स्वच्छता विभागांतर्गत जल जीवन मिशन व स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) अंतर्गत कार्यरत कर्मचाऱ्यांना मागील सुमारे पाच महिन्यांपासून मानधन मिळालेले नाही. त्यामुळे कर्मचाऱ्यांची दिवाळी अंधारात गेली असून, कर्मचाऱ्यांचा संयम संपलेला आहे.

> स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) अंतर्गत राज्यस्तरावरील बाह्य स्त्रोत यंत्रणेमार्फत कार्यरत कर्मचाऱ्यांचे मानधन नियमित दिले जाते, तसेच प्रतिनियुक्त अधिकारी-कर्मचाऱ्यांचे मानधनही नियमित आहे. जिल्हास्तरावर २०-२० वर्षे सेवा देणाऱ्या कर्मचाऱ्यांचे मानधन का दिले जात नाही? न्यायालयाच्या आदेशानुसार बाह्य स्त्रोत यंत्रणेमार्फत भरती करू नये, असे असतानाही भरती केली जात असून जल जीवन मिशनमधील मानधन न मिळण्यास जबाबदार अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी रमाकांत गायकवाड यांनी केली आहे.

न्यायालयाने दहा वर्षे पूर्ण केलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना शासन सेवेत कायम करण्याचा निर्णय दिला असतानाही शासनाकडून अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. या पार्श्वभूमीवर दिनांक ४ फेब्रुवारीपासून कर्मचाऱ्यांनी बेमुदत कामबंद आंदोलन सुरू केले असून, ४ ते ६ फेब्रुवारी दरम्यान जिल्हास्तरावर आंदोलन करण्यात आले. दिनांक ९ फेब्रुवारीपासून राज्यातील सुमारे ८०० कर्मचारी मुंबईतील आझाद मैदान येथे बेमुदत आंदोलनासाठी धडक देणार आहेत. शासनाने व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे मनधरणी करण्याचा प्रयत्न केला, मात्र कोणतीही मागणी मान्य न केल्याने आंदोलन सुरूच राहणार असल्याची माहिती महाराष्ट्र राज्य पाणी व स्वच्छता शासकीय कंत्राटी कर्मचारी कृती समितीचे अध्यक्ष रमाकांत गायकवाड यांनी दिली.



प्रलंबित मानधन तात्काळ जमा करणे, पुढील मानधनाबाबत लेखी तरतूद जाहीर करणे तसेच कंत्राटी कर्मचाऱ्यांना शासन सेवेत कायम करणे या प्रमुख मागण्या असून, त्या मान्य होईपर्यंत आंदोलन मागे घेतले जाणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला.

# श्री पित्ती यांचे घर ते परिवार किराणा दरम्यान सिमेंट रस्त्याचे भूमिपूजन

**जालना । प्रतिनिधी -** शहरातील पायाभूत सुविधांच्या विकासाला गती देणाऱ्या आणखी एका महत्त्वपूर्ण कामाचा शुभारंभ आज मोठ्या उत्साहात पार पडला. श्री पित्ती यांचे घर ते परिवार किराणा दुकानापर्यंत सुमारे ३० लक्ष रुपये खर्चाच्या सिमेंट कॉंक्रिट रस्त्याच्या बांधकामाचे भूमिपूजन शिवसेना उपनेते तथा आमदार अर्जुनराव खोतकर यांच्या हस्ते करण्यात आले.

या प्रसंगी उपस्थित नागरिकांशी संवाद साधताना आमदार अर्जुनराव खोतकर म्हणाले की, जालना विधानसभा मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी मी एक सुस्पष्ट विकास आराखडा तयार केला असून त्याच आराखड्यानुसार नियोजनबद्ध पद्धतीने काम करत आहे. जालना शहरातील नागरिकांना सर्व मूलभूत सोयी-सुविधा उपलब्ध करून देणे हे माझे प्राधान्य असून त्यासाठी सातत्याने विकासकामे मार्गी लावली जात आहेत.



ते पुढे म्हणाले की, पायाभूत सुविधा मजबूत झाल्यास नागरिकांचे दैनंदिन जीवन अधिक सुलभ होते आणि परिसराचा सर्वांगीण विकास साधला जातो. त्यामुळे रस्ते, पाणी, वीज, स्वच्छता यासारख्या मूलभूत विषयांवर भर देऊन काम सुरू असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

या भूमिपूजन सोहळ्याचे आयोजन माजी नगरसेवक गोपीकिशन गोगडे यांनी केले होते. कार्यक्रमास शिवसेना संपर्कप्रमुख पंडितदादा भुतेकर, शिवसेना जिल्हाप्रमुख. ऐ.जे. बोराडे, डॉ.श्रीमंत मिसाळ, डॉ. पवनकुमार सचदेव उद्योगपती महेंद्रसेठ पित्ती, उद्योजक सुरेंद्र सेठ प्रिती, शिवाजी गोंटे, प्रकाश घोडे,गोपीकिशन गोगडे यांच्यासह परिसरातील नागरिक, पदाधिकारी व मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या सिमेंट रस्त्याच्या बांधकामामुळे संबंधित परिसरातील नागरिकांना वाहतूक सुलभ होणार असून पावसाळ्यातील गैरसोयी दूर होण्यास मदत होणार आहे. नागरिकांनी या विकासकामाबद्दल समाधान व्यक्त करत आमदार अर्जुनराव खोतकर यांचे आभार मानले.

# उल्लेखनीय समाजकार्याबद्दल लॉयन्सच्या प्रांतीय सहसचिव मीनाक्षी दाड यांचा गौरव

**जालना । प्रतिनिधी -** लॉयन्स क्लब ऑफ अकोला मिडटाऊनच्यावतीने आयोजित ३० व्या (हृदय रोग निदान व शस्त्रक्रिया शिबिरप्रसंगी प्रांतीय सहसचिव लॉ. मीनाक्षी विजय दाड यांचा त्यांनी केलेल्या उल्लेखनीय समाजकार्याबद्दल वाडिया हॉस्पिटल मुंबईचे श्रीपाल जैन आणि डॉ. पारुल शाह यांच्या हस्ते आणि लॉ. सुभाष चांडक, क्लब अध्यक्ष लॉ. डॉ. मनोज अग्रवाल यांच्या प्रमुख उपस्थितीत विशेष अवार्ड देऊन गौरव करण्यात आला.

डॉ. सुभाष भांगडे यांच्या हस्ते या शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. प्रमुख पाहुणे म्हणून आ. वसंत खंडेलवाल, वाडिया हॉस्पिटलचे डॉ. के. एन. भोसले, डॉ. श्रीपाल जैन, डॉ. पारुल शाह, डॉ. अमरीश खटोड, डॉ. विशाल काळे, डॉ. तुषार चरखा, माजी प्रांतपाल रमाकांत खेतान, डॉ. कैलास मुरारका, किशोर गरड, तेजस झांबड, क्लबचे अध्यक्ष मनोज अग्रवाल, सचिव प्रशांत फुलारी, कन्वेनर अमित अग्रवाल, प्रकल्प प्रमुख सुभाष चांडक यांची उपस्थिती होती. गेल्या ३० वर्षांपासून अविरतपणे हा मानवतावादी उपक्रम राबविण्यात येत आहे. लॉयन्स क्लब ऑफ जालना येथे आपल्या अध्यक्षीय कार्यकाळात लॉ. मीनाक्षी दाड यांनी राबवलेल्या 'हृदय रोग निदान व शस्त्रक्रिया शिबिरा'ची गुणवत्ता आणि व्याप्ती लक्षात घेऊन विशेष अवार्ड देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. जीएसटी समन्वयक म्हणून काम करताना त्यांनी समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत पोहचण्यासाठी विविध उपक्रम राबवले आहेत. यामध्ये प्रामुख्याने आरोग्य क्षेत्रात रक्तदान, मधुमेह तपासणी, कॅन्सर जनजागृती आणि दृष्टिदान, पर्यावरण व कृषी क्षेत्रात वृक्षारोपण, 'प्यास बुझाओ' मोहीम आणि 'किसान भला तो देश भला' उपक्रम, सामाजिक क्षेत्रात अन्नदान, तीन वेळा गरीब मुलींचा सामूहिक विवाह सोहळा, महिला सशक्तीकरण, देशभक्तीपर कार्यक्रम आणि योग शिबिरे आधी उल्लेखनीय उपक्रम राबविले. त्याची दखल घेऊन त्यांचा विशेष गौरव करण्यात आला. सत्काराला उत्तर देताना मीनाक्षी दाड म्हणाल्या की, हा सन्मान केवळ माझा नसून प्रांतातील प्रत्येक क्लब टीमच्या निःस्वार्थ कार्याचा आहे. सेवा हीच खरी साधना या तत्त्वावर विश्वास ठेवून आगामी काळातही अधिक व्यापक आणि प्रभावी पद्धतीने काम करण्याची ग्वाही त्यांनी या प्रसंगी दिली.या कार्यात बहुप्रांतीय जीएसटी समन्वयक पुरुषोत्तम जयपुरिया, माजी प्रांतपाल विजय बगडिया आणि विजय दाड यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभल्याचे त्या म्हणाल्या. या यशाबद्दल लॉयन्स परिवारातर्फे आणि विविध स्तरांतून मीनाक्षी दाड यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.